■ e-paper.diwanews.com ■ सोमवार, २० जानेवारी २०२५ ■ पाने-८ ■ किंमत ४ रु. ■ RNI No.-MAHMAR/2021/80669 ⊕www.diwanews.com

दिशादर्शक, मार्गदर्शक!

# दिवा न्यूज

➤ वर्ष-४

➤ अंक-२५

# दिव्याला कोट्यावधीचा निधी दिल्याच्या घोषणा होतात, मात्र ३५ हून अधिक वर्षे झाली तरी दिवा भागातील पाणी समस्या सुटत नाही हे महापालिकेवर एकहाती सत्ता असणाऱ्यांचे अपयश!

## भाजपचे ठाणे सचिव विजय भोईर यांचा मित्रपक्ष शिवसेना शिंदे गटाला घरचा आहेर

## शहराचा विकास करता येत नसेल तर दिवा शहराला ठाणे महानगरपालिकेतून वगळा - विजय भोईर



**दिवा:- दिवा शहराला कोट्यावधीचा निधी उपलब्ध करून दिल्याच्या वल्गना ठाणे महानगरपालिकेत एकहाती सत्ता असणारे करतात. मात्र ३५ हून अधिक वर्षे झाली तरीही दिव्यातील पाणी प्रश्नासह अन्य समस्या काही सुटत नाहीत. जर शहरातील समस्या एक हाती सत्ता असणाऱ्याना सोडवता येत नसतील तर दिवा शहर ठाणे महानगरपालिकेतून वगळा असा घरचा आहेर दिवा भाजपचे नेते व ठाणे शहर सचिव विजय भोईर यांनी मित्र पक्ष शिवसेना शिंदे गटाला दिला आहे.**

ठाणे महानगरपालिकेवर शिवसेनेची एक हाती सत्ता आहे.मागील पाच वर्षे दिवा शहरात शिवसेनेचे एक हाती वर्चस्व आहे. मागील पाच वर्षात दिवा शहराच्या विकासासाठी कोट्यावधीचा निधी आणल्याच्या घोषणा सत्ताधारी पक्षाकडून वारंवार होत असतात, मात्र या निधीचा सर्वसामान्य नागरिकांना किती उपयोग झाला? असा सवाल भाजपचे विजय भोईर यांनी उपस्थित केला आहे. येथील जनतेला पाणी समस्येपासून आजही मुक्ती मिळालेली नाही याकडे त्यांनी लक्ष वेधले आहे.पाणी समस्या सोडवण्यासाठी येथील सत्ताधारी नेतृत्वाने ठोस अशा उपायोजना केल्या नसून येथील जनतेला पाण्यापोटी तीन ते चार हजार रुपये महिन्याला खर्च करावे लागतात. अनेक नागरिकांना आजही त्यांच्या घरामध्ये अधिकृत पाणी कनेक्शन उपलब्ध झालेली नाहीत. हे सत्ताधारी पक्षाच्या नेतृत्वाचे अपयश आहे. दिवा शहरात कोट्यावधीचा निधी दिला सांगता मग येथील जनतेला पाणी समस्येपासून मुक्ती का मिळाली नाही. असा सवालही विजय भोईर यांनी केला आहे. ठाणे महानगरपालिकेत एक हाती सत्ता असतानाही ठाणे महानगरपालिकेसाठी नवी मुंबईच्या धर्तीवर स्वतंत्र धरण अद्याप का उपलब्ध झाले नाही?पाणी प्रश्न सोडवण्यासाठी ठोस उपाययोजना का झाल्या नाहीत? दिवा शहरातील नागरिकांना अंतर्गत जलवाहिन्या टाकून मुबलक पाणी उपलब्ध का करून देण्यात आले नाही असा सवाल ठाणे महानगरपालिकेवर मागील काही वर्ष एक हाती सत्ता असणाऱ्याना विजय भोईर यांनी केला आहे. विजय भोईर यांच्या या भूमिकेमुळे त्यांनी मित्र पक्षालाच दिवा शहरात घरचा आहेर दिला आहे. दिवा शहरातील समस्या न सुटण्यास एक हाती सत्ता असणारा मित्र पक्ष जबाबदार असल्याचा आरोप विजय भोईर यांनी केला असून दुसरीकडे नवी मुंबईत भविष्याची काळजी असणारे नेतृत्व असल्याने तेथील जनतेला चांगल्या सुविधा मिळत असल्याचेही विजय भोईर यांनी सांगितले आहे. विजय भोईर यांच्या या भूमिकेमुळे आगामी काळात दिवा शहरात भाजप व शिवसेनेमध्ये वादाची ठिणगी पडते का? असा प्रश्न आता उपस्थित होत आहे.ठाणे महानगरपालिकेत दिवा शहराचा समावेश होऊन ३५ वर्षाहून अधिक काळ झाला मात्र या ३५ वर्षाच्या काळामध्ये येथील समस्या सोडवण्यास ठाणे महानगरपालिकेला पूर्णतः अपयश आले. कशाही पद्धतीने रस्त्यावर फेरीवाले बसवले जातात. पाण्याची समस्या या ठिकाणी मागील अनेक वर्षांपासून भेडसवत आहे.कचरा समस्येवर तोडगा काढण्यात ठाणे महानगरपालिका अपयशी ठरली आहे. डम्पिंग ग्राउंड बंद केले मात्र ते पुन्हा सुरू करण्यात येत आहे. त्याचबरोबर आरोग्य प्रश्न शिक्षण व्यवस्था या सगळ्याच आघाड्यांवर ठाणे महानगरपालिका प्रशासन दिवा शहरासाठी अपयशी ठरले असून या अपयशाची जबाबदारी ठाणे महानगरपालिकेवर एक हाती सत्ता असणारे घेणार आहेत का?असा सवालच विजय भोईर यांनी उपस्थित केला असून जर दिवा शहरातील समस्या सोडवण्यात येत नसतील, ठाणे महानगरपालिकेला अपयश येत असेल तर दिवा शहर ठाणे महानगरपालिकेतून वगळावे अशी मागणीच आता विजय भोईर यांनी यानिमित्ताने केली आहे.

> "मागून निर्माण झालेल्या नवी मुंबई महापालिकेने स्वत:चे धरण बांधले, मात्र ठाणे महानगरपालिकेला पाणी प्रश्न सोडवण्यात आजही अपयश का?"

*दिवा ठाणे महानगरपालिकेत समाविष्ट होऊन ३५ हून अधिक वर्षे झाली. मात्र या काळात ठाणे महानगरपालिकेवर एक हाती सत्ता असणाऱ्या उपमुख्यमंत्र्यांच्या नेतृत्वाखाली दिवा शहरातील नागरिकांचे मूलभूत प्रश्न सुटले का? येथील लोकप्रतिनिधींनी त्यासाठी प्रयत्न केले का? हा माझा प्रश्न आहे.दुसरीकडे आपल्या मागून निर्माण झालेली नवी मुंबई महापालिका आज तेथील नागरिकांना भाजप नेते गणेश नाईक यांच्या नेतृत्वाखाली उत्तम दर्जाच्या सुविधा देत आहे. तेथील पाणी समस्या सोडवण्यासाठी महापालिकेचे स्वतः चे धरण बांधले आहे.ठाणे महानगरपालिकेचे नेतृत्व करणारे याबाबतीत मागे का राहिले इतकाच माझा प्रश्न आहे.*

**- विजय भोईर,** सचिव
भारतीय जनता पार्टी,
ठाणे शहर जिल्हा

दिशादर्शक, मार्गदर्शक!
# दिवा न्यूज
www.diwanews.com
सोमवार, दि. २० जानेवारी २०२५





# कोकेनच्या मुद्देमालसह त्रिकुट अटकेत
## एका नायजेरियनचा समावेश

**ठाणे :** कोकेन हे अंमली पदार्थ विक्रीसाठी आलेल्या नवीमुंबईतील ओन्यादीकांची वॉन्को प्राचिओस (२४) या नायजेरियनसह भायखळा येथील अझर उर्फ आलम आबीद शेख (२७) व उस्मान उर्फ सोनू अब्दुल कादीर शेख (३७) या त्रिकुटाला ठाणे शहर पोलिसांनी अटक केली. तसेच त्यांच्याकडून १०१.१६ ग्रॅम वजनाचा १० लाख १२ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केल्याची माहिती ठाणे पोलिसांनी दिली.

नवीन आरटीओ कार्यालयाजवळील सेवा रस्त्यावर अंमली पदार्थ विक्रीसाठी एक जण येणार असल्याची माहिती ठाणे पोलिसांच्या मालमत्ता गुन्हे शाखेला मिळाली होती. त्यानुसार ७ जानेवारी रोजी या भागात सापळा रचुन अझर याला अटक केली. त्याच्या चौकशीत आलेल्या माहितीनुसार आणखी दोघांना अटक करून एकूण मुद्देमाल जप्त केला. या प्रकरणी वागळे पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्या त्रिकुटाने जप्त केलेला कोकेन हा अंमली पदार्थ त्यांनी कोठुन आणला ? तसेच या व्यतिरीक्त आणखी साठा आहे का? याबाबत अधिक तपास मालमत्ता गुन्हे कक्ष करीत आहेत. ही कामगिरी अमरसिंह जाधव, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), सहाय्यक पोलीस आयुक्त राजकुमार डोंगरे यांचे मार्गदर्शनाखाली मालमत्ता गुन्हे कक्ष, गुन्हे शाखा, ठाणे शहर कक्षाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक गोरखनाथ घार्गे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.



# पोलचा तुटून लटकणारा लोखंडी भागाचा धोका टळला

**ठाणे:** सिव्हिल हॉस्पिटल समोर महावितरणच्या जुन्या वापरात नसलेल्या पोलचा लोखंडी भाग तुटून लटकत असल्याचा प्रकार बुधवारी दुपारी दीड वाजण्याच्या सुमारास समोर आला. सुदैवाने वेळी ही बाब लक्षात आल्यानंतर निर्माण झालेला धोका दूर करण्यातही यश आले. शिवाय मोठे अनर्थ टळले.

ठाणे सिव्हिल हॉस्पिटल समोर महावितरणच्या जुन्या वापरात नसलेल्या पोलचा लोखंडी भाग तुटून लटकत असल्याची माहिती महेश नामक इसमाने ठाणे महापालिका आपत्ती व्यवस्थापन कक्षेला दिली. घटनेचे गांभीर्य लक्षात घेत, महावितरण, अग्निशमन दल आणि आपत्ती व्यवस्थापन या विभागांनी धाव घेतली. तसेच हायड्रॉलिक लिफ्टर वाहनाच्या मदतीने तो धोकादायक भाग काढून बाजूला केला अशी माहिती आपत्ती व्यवस्थापन अधिकाऱ्यांनी दिली.

## ठाणे शहर पोलीस आयुक्तालयात मांजाप्रकरणी ९ गुन्हे दाखल
# मोठयाप्रमाणावर नायलॉन व काच मिश्रीत मांजा केला जप्त

**ठाणे:** नायलॉन तसेच काचमिश्रीत मांजाचा वापर मोठ्या प्रमाणात वापर होत असल्याची बाब ठाणे शहर पोलिसांनी केलेल्या कारवाईनंतर उघडकीस आली आहे. तर पोलिसांनी ठाणे शहर पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीत तब्बल ०९ गुन्हे दाखल करत, मोठया प्रमाणावर नायलॉन व काच मिश्रीत मांजाही जप्त केला आहे. ही कारवाई आणखी काही दिवस सुरूच राहणार असल्याची माहिती ठाणे शहर पोलीस दलाचे जनसंपर्क अधिकारी तथा वरिष्ठ पोलीस निरीक्षक शैलेश साळवी यांनी दिली.

मकर संक्राती निमित्ताने पतंग उडविण्याची परंपरा आहे. पतंग उडविण्यासाठी पुर्वापार पध्दतीने वापरण्यात येणारा मांजा न वापरता नायलॉन तसेच काचमिश्रीत मांजाचा वापर मोठ्या प्रमाणात करण्यात येत आहे असे निर्दशनास आले आहे. सदर नायलॉन व



काचमिश्रीत मांजामुळे मोटारसायकलस्वार, पादचारी हे मोठ्या प्रमाणात जखमी होवून प्रसंगी त्यांचा मृत्यू देखील होत आहे.

अशा घटना होवू नयेत म्हणून ठाणे पोलीस आयुक्तालय हद्दीत अशा प्रकारचा मांजा तयार करणे, विकणे, वापर करणे यावर मनाई करण्यात आलेली आहे. तसेच या आदेशांचे उल्लंघन करणाऱ्या इसमांविरूध्द कायदेशिर कारवाई करण्याबाबत शहर पोलीस आयुक्त आशुतोष डुंबरे यांनी सर्व पोलीस स्टेशनला सुचना देखील केलेल्या आहेत. त्यानुसार पोलीस आयुक्तालय हद्दीत पोलीसांनी छापे मारून एकुण ०९ गुन्हे भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम २२३ व पर्यावरण (संरक्षण) कायदा १९८६ च्या कलम ५,१५ अन्वये दाखल केले. तसेच मोठया प्रमाणावर नायलॉन व काच मिश्रीत मांजा जप्त करण्यात आला आहे. तसेच सदरची कारवाई आणखी काही दिवस चालू राहणार आहे. तसेच कोणीही सदर नायलॉन /काचमिश्रीत मांजाचे उत्पादन, विक्री किंवा सदर मांजाचा वापर करून पतंग उडवू नये. याशिवाय असे करताना जर कोणी व्यक्ती आढळून आल्यास त्याबाबतची माहिती त्वरीत ठाणे मुख्य नियंत्रण कक्ष तसेच ११२ या हेल्पलाईनवर संपर्क साधावा असेही आवाहन केले आहे.

# कोपरखैरणे विभागातील मुख्य रस्त्यांवर सखोल स्वच्छता मोहीमा

सखोल स्वच्छतेव्दारे हवा गुणवत्ता सुधारणेवर भर देत ३० डिसेंबर पासून १३ जानेवारी पर्यंत आठही विभाग कार्यालय क्षेत्रात महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली सार्वजनिक सुट्ट्यांसह सलग १५ दिवस सखोल स्वच्छता मोहीमा प्रभावीपणे राबविण्यात आल्या. त्यामुळे हवा गुणवत्तेत सुधारणा झाल्याच्या प्रतिक्रिया नागरिकांकडून व्यक्त करण्यात येत आहेत.

अतिरिक्त आयुक्त श्री. सुनिल पवार यांच्या नियंत्रणाखाली राबविल्या जात असलेल्या या स्वच्छता मोहीमांमध्ये प्राधान्याने रस्ते, पदपथ, दुभाजक यांच्या कडेला जमा झालेली माती गोळा करुन त्याठिकाणी प्रक्रियाकृत पाण्याने स्वच्छता करण्यावर भर देण्यात आला. ही मोहीम अशीच पुढे चालू ठेवत कोपरखैरणे विभाग कार्यालय हद्दीत सहा. आयुक्त तथा विभाग अधिकारी श्री. सुनिल काठोळे व स्वच्छता अधिकारी राजूसिंग चव्हाण यांच्या माध्यमातून १६ जाने.रोजी सेक्टर २ मुख्य रस्ता तसेच १७ जाने. रोजी समतानगर व खैरणे गाव व गावठाण मुख्य रस्ता या ठिकाणी सखोल स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. त्याचप्रमाणे से.११ कोपरखैरणे येथील मुख्य रस्त्यावरील दुभाजक पाण्याने साफ करुन रंगावरील धूळ धुवून घेण्यात आली. अशाप्रकारे सखोल स्वच्छता मोहीमा सर्व विभागांमध्ये राबविण्यात येत आहे.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक आणि संपादक सुहास शांताराम खंडागळे यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया आणि पब्लीकेशन प्रा. लि. प्लॉट क्र. डब्ल्यू २३०, टीटीसी खैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून, श्रीकृपा बिल्डींग, ए-विंग, पहिला माळा, फ्लॅट क्रमांक १०१, सेंट मेरी शाळेजवळ, दिवा (पूर्व), ठाणे-६१२ ता/जि-ठाणे राज्य-महाराष्ट्र येथून प्रकाशित केले. संपर्क-८०८०९७७९५५
संपादक-सुहास शांताराम खंडागळे RNI No.-MAHMAR/2021/80669

# साईबाबा मंदिर वर्धापन दिनानिमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन

**दिवा :-** दिवा शहरातील श्री साईबाबा चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने श्री साईबाबा मंदिर देवस्थानचा अकरा वर्धापन दिन सोहळा व साईबाबा भंडारा दिनांक २२ जानेवारी ते २६ जानेवारी दरम्यान आयोजित करण्यात आला आहे.

या कार्यक्रमाचे आयोजन संस्थेचे संस्थापक नरेश पवार व अध्यक्ष रेशमा पवार यांच्या वतीने करण्यात आले आहे. दरवर्षीप्रमाणे यंदाही श्री साईबाबा चॅरिटेबल ट्रस्ट कडून श्री साईबाबा मंदिर देवस्थानाच्या अकराव्या वर्धापन दिनाचे औचित्य साधून बुधवार दिनांक २२ जानेवारी ते रविवार दिनांक २६ जानेवारी पर्यंत महा भंडारा आयोजित करण्यात आला असून यादरम्यान सांस्कृतिक कार्यक्रम भजन, कीर्तन, मान्यवरांचा सत्कार अशा अनेक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.या कार्यक्रमाला भाविकांनी उपस्थित राहावे अशी विनंती आयोजकांच्या वतीने करण्यात आली आहे.






# ठाण्याच्या ज्यादा पाण्यासाठी हालचालींना आला वेग..

## विधिमंडळासह ठाणे, मुंबई महापालिका स्तरावर आ.संजय केळकर यांच्या जोर-बैठका

**ठाणे:** वाढत्या ठाणे शहराला आवश्यक असलेले अतिरिक्त ५० एमएलडी पाणी मिळण्यासाठी आमदार संजय केळकर यांनी ठाणे आणि मुंबई महापालिका व्हाया विधिमंडळ असा मॅरेथॉन पाठपुरावा सुरूच ठेवला असून शहराला तातडीने २५ एमएलडी पाणी लवकरच निश्चित मिळेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला आहे.

ठाणे शहराला अपुऱ्या पाणी पुरवठ्यामुळे पाणीटंचाई भेडसावत आहे. एकीकडे ठाण्यात विशेषतः घोडबंदर परिसर व बाळकुम, कोलशेत, ढोकाळी आदी भागाला पाणीटंचाई भेडसावत आहे. तर दुसरीकडे शहरात अनेक बहुमजली भव्य गृहसंकुले उभी राहत आहेत. त्यामुळे भविष्यात पाण्याचा तुटवडा आणखी मोठ्या प्रमाणात भासणार आहे. त्यादृष्टीने आमदार संजय केळकर यांनी अधिवेशनात अनेकवेळा वाचा फोडली असून ठाणे महापालिकेसह मुंबई महापालिकेकडे पाठपुरावा सुरू ठेवला आहे.

नुकत्याच पार पडलेल्या हिवाळी अधिवेशनात आवाज उठविल्यानंतर २८ डिसेंबर रोजी मुंबई महापालिकेचे आयुक्त भूषण गगराणी यांची भेट घेऊन सकारात्मक चर्चा केली. तसेच, पाणी पुरवठा विभागाची जबाबदारी असलेले अतिरिक्त आयुक्त अभिजित बांगर यांचीही भेट घेतली. त्यानंतर ३ जानेवारीला मुंबई महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागाचे उपजल अभियंता, कार्यकारी अभियंता आणि ठाणे महापालिकेच्या पाणी पुरवठा विभागाच्या अधिकाऱ्यांची भेट घेतली. १७ जानेवारी रोजी हायड्रोलिक इंजिनिअर आणि ठामपा पाणी अधिकारी यांची वरळी येथे बैठक घेऊन ठाणे शहराला मुंबईकडून मिळणाऱ्या नियोजित ५० एमएलडी पाण्यापैकी २५ एमएलडी पाणी तातडीने मिळावे याबाबत आग्रह धरला. दरम्यान, राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचीही भेट घेऊन आमदार संजय केळकर यांनी हा पाणी प्रश्न कायमस्वरुपी निकाली काढण्यासाठी येत्या आठवड्यात एका विशेष बैठकीचे आयोजन केल्याचे सांगितले. त्यामुळे, तुर्तास ठाण्याला ५० एमएलडीपैकी तातडीने २५ एमएलडी पाणी निश्चितपणे मिळेल, असा विश्वास आ. केळकर यांनी व्यक्त केला आहे.

# कोपरखैरणे विभागातील मुख्य रस्त्यांवर सखोल स्वच्छता मोहीमा

**नवी मुंबई :** सखोल स्वच्छतेव्दारे हवा गुणवत्ता सुधारणेवर भर देत ३० डिसेंबर पासून १३ जानेवारी पर्यंत आठही विभाग कार्यालय क्षेत्रात महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली सार्वजनिक सुट्ट्यांसह सलग १५ दिवस सखोल स्वच्छता मोहीमा प्रभावीपणे राबविण्यात आल्या. त्यामुळे हवा गुणवत्तेत सुधारणा झाल्याच्या प्रतिक्रिया नागरिकांकडून व्यक्त करण्यात येत आहेत.



अतिरिक्त आयुक्त सुनिल पवार यांच्या नियंत्रणाखाली राबविल्या जात असलेल्या या स्वच्छता मोहीमांमध्ये प्राधान्याने रस्ते, पदपथ, दुभाजक यांच्या कडेला जमा झालेली माती गोळा करुन त्याठिकाणी प्रक्रियाकृत पाण्याने स्वच्छता करण्यावर भर देण्यात आला. ही मोहीम अशीच पुढे चालू ठेवत कोपरखैरणे विभाग कार्यालय हद्दीत सहा. आयुक्त तथा विभाग अधिकारी सुनिल काठोळे व स्वच्छता अधिकारी राजूसिंग चव्हाण यांच्या माध्यमातून १६ जानेवारी रोजी सेक्टर २ मुख्य रस्ता तसेच १७ जानेवारी रोजी समतानगर व खैरणे गाव व गावठाण मुख्य रस्ता या ठिकाणी सखोल स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. त्याचप्रमाणे से.११ कोपरखैरणे येथील मुख्य रस्त्यावरील दुभाजक पाण्याने साफ करुन रंगावरील धूळ धुवून घेण्यात आली. अशाच प्रकारच्या सखोल स्वच्छता मोहीमा सर्वच विभागांमध्ये राबविण्यात येत आहेत.



## बंद पडलेल्या टेम्पोतून तेल गळती; वाहतुकीवर परिणाम

ठाणे: ईस्टर्न एक्सप्रेस हायवे, तीन हात नाका ब्रिज वरती मुंबईकडे जाणाऱ्या वाहिनीवर अचानक टेम्पो बंद पडले. त्या टेम्पो मधून रोडवरती तेल पसरल्याची घटना गुरुवारी दुपारी दोन वाजण्याच्या सुमारास समोर आला असून या घटनेचा वाहतुकीवर परिणाम झाला होता.

भिवंडी कडून मस्जिद बंदरकडे जाणारा टेम्पो अचानक बंद पडल्यानंतर त्यामधील तेल रस्त्यावर सांडल्याचे माहिती ठाणे वाहतूक पोलीस हवालदार अरुण काळे यांनी दिल्यानंतर घटनास्थळी शहर वाहतूक आणि आपत्ती व्यवस्थापन या विभागांनी धाव घेतली. त्या रस्त्यावर सांडलेल्या तेलावरती माती पसरविण्यात आली तसेच शहर वाहतूक विभागाच्या टोव्हिंग गाडीच्या मदतीने टेम्पो बाजूला करण्यात आला. त्यानंतर तो रस्ता वाहतुकीसाठी मोकळा झाल्याची माहिती आपत्ती व्यवस्थापन अधिकाऱ्यांनी दिली.

दिशादर्शक, मार्गदर्शक!
दिवा न्यूज
www.diwanews.com
सोमवार, दि. २० जानेवारी २०२५


# एमडी व कोडीयनयुक्त कफ सिरफसह तिघांना अटक

## एका नायजेरियनचा समावेश




**ठाणे :** एम डी (मॅफेड्रॉन) पावडर तसेकंग कोडीयन युक्त कफ सिरफ या वेगवेगळ्या दोन अंमली पदार्थाच्या गुन्ह्यात एका नायजेरियनसह तिघांना ठाणे अंमली पदार्थ विरोधी पथकाने अटक करत, त्यांच्याकडून ६७ लाख १२ हजार ३७७ रुपये किंमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. अटकेतील नायजेरियन हा अंमली पदार्थाच्या गुन्ह्यात ६ वर्ष शिक्षा भोगून नोव्हेंबर २०२४ मध्ये कारागृहातून बाहेर आल्यानंतर पुन्हा १२ जानेवारी २०२५ मध्ये अंमली पदार्थ बाळगल्याप्रकरणी केलेल्या कारवाईत तो मिळून आल्याची माहिती पोलीस उपायुक्त ( गुन्हे शाखा) अमरसिंह जाधव यांनी पत्रकार परिषदेत दिली.

मुंबई मस्जिद बंदर रोड येथील जॉन जेम्स फ्रान्सिस उर्फ ओनाह चिडोझी एथलबर्ट उर्फ जॉन इझुग्वा फ्रान्सिस (४५) या नायजेरियन याला शीळ डायघर , देसाई नाका येथे केलेल्या कारवाई अटक केली. त्यांच्याकडून ६६ लाख १८ हजार रुपये किंमतीचे ६६१.८ ग्रॅम वजनाची एमडी पावडर मिळून आली. याप्रकरणी शीळ डायघर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करून त्याला अटक करण्यात आली तसेच येत्या १७ जानेवारी पर्यंत त्यांना पोलीस कोठडीत ठेवण्याचे आदेश न्यायालयाने दिले आहे. तर त्याच्या विरोधात बांद्रा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल असून अंमली विरोधी पदार्थाच्या गुन्ह्यात तो सहा वर्षे शिक्षा भोगून बाहेर आलेला आहे. तसेच दुसऱ्या कारवाईत कोनगाव परिसरात कोडीयनयुक्त कफ सिरपच्या एकूण ४६७ बाटल्या विक्री करिता बेकायदेशीरपणे कब्जा बाळगणाऱ्या भिवंडीतील नौशाद अन्सार अहमद शेख (५५) आणि मोहम्मद तवकीर फारूक अन्सारी (२४) या दोघांना अटक करण्यात आली आहे. जप्त केलेल्या बाटल्यांची किंमत ८७ हजार ७७७ रुपये इतकी असल्याची माहिती पोलिसांनी दिली. याप्रकरणी कोनगाव पोलीस ठाण्यामध्ये गुन्हा दाखल करण्यात आला आहे तर अटकेतील नौशाद याच्यावर यापूर्वीही एनडीपीएस कायद्याअंतर्गत शांतिनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल आहे. अटकेतील त्रिकुटाने एमडी व कफ सिरफचा साठा कुठून आणला आहे? त्यांचे आणखी साथीदार कोण आहेत ? याचा तपास पोलीस करत आहेत. एक कारवाई आमचे पदार्थ विरोधी पथकाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राहुल मस्के यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक निलेश मोरे जगदीश गावित पोलीस उपनिरीक्षक दीपेश किनी भोसले राजेंद्र निकम मोहन परब या पथकाने केली आहे.

## अतिक्रमण विभागामार्फत बेलापूर विभागात निष्कासनाची कारवाई

**नवी मुंबई :** नवी मुंबई महापालिकेच्या अतिक्रमण विभागाच्या वतीने नोटीस देऊनही संबधितांनी नोटिशीची दखल न घेतल्यामुळे अनधिकृत बांधकामाविरोधात नवी मुंबई महानगरपालिका अतिक्रमण विभागामार्फत मा. आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या निर्देशानुसार व अतिरिक्त आयुक्त (२) डॉ. राहुल गेठे यांच्या मार्गदर्शनाखाली अतिक्रमण विभागाने बेलापूर विभागात निष्कासनाची कारवाई करण्यात आली.

आदेश वाघमारे, घर क्र. ४०४, सेक्टर-२०, बेलापूर गांव, २) महेश मोतीराम कुंभार, घर क्र.७०६ सेक्टर-१९, शहाबाज गांव, बेलापूर ३) प्रशांत जोशी, घर क्र. ५९४,सेक्टर-२०, बेलापूर, ४) नान्हे अब्दुल अन्सारी, घर क्र.०५७४, सेक्टर-१९/बी, फणसपाडा बेलापूर ५) मधुकर चंदर म्हात्रे व इतर, भु.क्र.बी-३३५ व बी-३३६, सेक्टर-२०, बेलापूर, नवी मुंबई येथील अनधिकृत बांधकामास ए विभाग बेलापूर कार्यालयामार्फत महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ मधील कलम ५४ अन्वये नोटीसा बजाविण्यात आलेल्या आहेत.

|| एकमेका सहाय्य करुं, अवघे धरुं सुपंथ ||
स्थापना १९८७

स्नेही सहकारी पतसंस्था मर्या. मुंबई

बीओएम/ डब्लूडी /आर.एस.आर./(सि.आर.)/४००/१९८६-८७

प्रशासकीय कार्यालय :- स्नेही भवन, ३१५ बस डेपो जवळ, हॉटेल सेलिब्रेशनच्या बाजूला, शासकीय वसाहत, बांद्रा (पूर्व), मुंबई-४०००५१. संपर्क : ८५९१८६६८९०
Email: snehipatsanstha.bandra@gmail.com

◆ प्रभावी व्यवस्थापन ◆ नवा विश्वास ◆ नवी उमेद

✻ शाखा ✻
- बांद्रा - ८५९१८६६८९०
- नायगाव (वसई) - ९०८२३६२१४३
- मलकापूर (कोल्हापूर) - ९४०३७६७१३४
- अंबाडी(भिवंडी) - ८९९९६३८२२२
- दिवा (ठाणे) - ७४००४५४१६८

अधिकृत भागभांडवल :- रु. ५ कोटी
वसुल भागभांडवल :- रु. १ कोटी
एकुण ठेवी :- रु १२ कोटी
कर्ज :- रु. ८.५ कोटी
गुंतवणूक :- रु. २ कोटी
खेळते भांडवल :- रु. २५ कोटी

संस्थेच्या आकर्षक ठेव योजना व व्याज दर

मुदत ठेव
३० दिवस ते ९० दिवसांपर्यंत :- ६%
९१ दिवस ते १८० दिवसांपर्यंत :- ७%
१८१ दिवस ते ३६४ दिवसांपर्यंत :- ८%
१ वर्ष पूर्ण :- ९ %
२ वर्ष पूर्ण :- ९.५० %
३ वर्ष पूर्ण :- १०%
ज्येष्ठ नागरिक यांना अर्धा टक्के व्याज अधिक

दामदुप्पट ठेव
मुदत ७ वर्ष ६ महिने

आवर्त ठेव
१ वर्ष ८% | २ वर्ष ९%
३ वर्ष १०%

दैनंदिन (धनलक्ष्मी) ठेव
६ महिने पूर्ण ३.५% | १ वर्ष ६%
२ वर्ष ७% | ३ वर्ष ८%

✻ संस्थेची ठळक वैशिष्ट्ये ✻
- तत्पर सेवा
- मायक्रो फायनान्स (ग्रुप लोन)
- कुशल व उच्च शिक्षित अभ्यासु नेतृत्व

सोने तारण कर्जाची खास सोय

त्वरीत जवळच्या शाखेत संपर्क साधावा

दिशादर्शक, मार्गदर्शक!
# दिवा न्यूज
सोमवार, दि. २० जानेवारी २०२५ पान : ५
www.diwanews.com

# खारेगाव खाडी पुलाच्या दुभाजकाचा काही भाग कोसळला खाडीत



**ठाणे :** मुंबई-नाशिक मार्गावरील खारेगाव येथील खाडी पुलाच्या मधोमध काही अंतर सोडण्यात येतो. तो मोकळा भाग स्लॅब टाकून बंदिस्त करून दुभाजक तयार केला होता. त्याच दुभाजकाचा काही भाग कोसळून खाडीत पडल्याने त्या पडलेल्या भागातून थेट पाण्याचे दर्शन होत आहे. शिवाय सुरक्षेच्या दृष्टीकोनातून त्या ठिकाणी मार्गरोधक लावण्यात आले आहेत.

सध्या तो खाडी पुल मात्र सुस्थितीत असून या पुलावरील दोन्ही बाजूची वाहतूक सुरळीतपणे सुरू आहे. तसेच या दुभाजकाच्या दुरुस्तीचे काम तातडीने हाती घेण्यात येईल असेही सूत्रांकडून सांगण्यात आले आहे.

ठाणे खारेगाव खाडी पुल हा सुमारे ३० ते ३५ वर्षे जुना झाला असून त्याशेजारी नवी पुलांचे काम सुरू आहे. ते काम झाल्यानंतर जुना पुलाच्या मजबुतीकरणाचे काम हाती घेण्यात येणार आहे. असे असतानाच, शनिवारी रात्री खाडी पुलाच्या दुभाजकाचा काही भाग अचानक खाडीत कोसळून खाली पडला. याठिकाणी नवीन खाडी पुलाचे काम करीत असलेल्या कामगारांनी हा प्रकार पाहून राज्य रस्ते विकास महामंडळाच्या अधिकाऱ्यांना याबाबत माहिती दिली. त्यानंतर अधिकाऱ्यांनी धाव घेऊन जो भाग पडला तेथे सुरक्षेच्या दृष्टीकोनातून मार्गरोधक लावले.

या पुलावरून अवजड आणि खासगी वाहनांची वाहतूक सुरू आहे. हा पूल मुंबई महानगरातील इतर रस्त्यांना जोडल्याने हा मार्ग महत्वाचा मानला जातो. त्यातच या मार्गाला समृद्धी मार्ग जोडण्यात येणार असून त्यासाठी हा रस्ता रुंद करण्याचे काम जोरात सुरू आहे. त्यातच घटना घडल्यानंतर पुलावरील रस्ते सुस्थितीत असल्याने येथून वाहतूक सुरळीतपणे सुरू आहे.

## नव्यात वर्षाच्या पहिल्या सतरा दिवसात आगीच्या ४१ घटनांचा खतरा

**ठाणे:** गतवर्षात ठाणे महापालिका हद्दीत लहान मोठ्या अशा एक हजार ८१६ आगीच्या घटनांची नोंद झाली असताना, नव्या वर्षात आगीच्या घटनांचा सिलसिला ठाण्यात सुरुच असल्याचे दिसत आहे. २०२५ या नव्या वर्षातील पहिल्या १७ दिवसात तब्बल ४१ घटनांची ठाणे महापालिका आपत्ती व्यवस्थापन कक्षेत नोंद झाली असून हॉटेलच्या घटनेत एका मांजराचा धुराने गुदमरून मृत्यू झाला आहे. तर इतर घटनांमध्ये धुरात अडकलेल्या ३०० जणांना बाहेर काढून त्यांचे प्राण वाचविण्यात यश आले आहे. मात्र अशाच घटना कायम राहिल्यास त्याचा खतरा जास्त असल्याचे दिसत आहे.

२०२४ मध्ये ठाणे शहरात अक्षरशः आगीचा भडकाच उठाला होता. त्या वर्षाच्या सुरुवातीला म्हणजे जानेवारी, फेब्रुवारी, मार्च तसेच एप्रिल या चार महिन्यात तब्बल ३७६ घटनांची नोंद झाली होती. तर वर्षाच्या अखेरपर्यंत एक हजार ८१६ इतक्या घटनांची नोंद झाली. त्यातच याच्या पहिल्या १७ दिवसात ४१ घटनांची नोंद झल्याने यंदाही आगीच्या घटनांचा भडका उडतो की काय अशी भीती व्यक्त केली जात आहे. गतवर्षी मुंब्रा आणि गायमुख येथील घटनांमध्ये दोघांचा मृत्यू झाला होता. पण, या वर्षाच्या सुरुवातीला एका मांजराचा गुदमरून मृत्यू झाला आहे. याशिवाय लॉंड्री, फर्निचर, कार गॅरेज या सारख्या दुकानांसह कचऱ्याला ही आग लागत आहे. याशिवाय मीटर बॉक्स असो या स्विच बोर्ड किंवा वॉशिंग मशीनला आग लागली आहे. त्यातच मेंटल हॉस्पिटलमध्ये कचऱ्याला लागलेल्या आगीची झळ तेथे बाजूला बंद पडलेल्या सर्व्हीस सेंटर बसली होती. त्या ४१ घटनांपैकी काही घटनांमध्ये तब्बल ३०० जणांचे प्राण ठामपा अग्निशमन आणि आपत्ती व्यवस्थापन या विभागांना वाचविले आहे.

वातानुकुलीत यंत्रणा वेळच्या वेळी सर्व्हीसींग न करणे, वीजेची उपकरणांची तपासणी योग्य वेळेत न करणे यामुळे आगीच्या घटना घडत असल्याचे तज्ञांचे म्हणने आहे. त्यामुळे अशा घटना टाळण्यासाठी वेळच्या वेळी सर्व्हीसीग आणि विजेची उपकरणे दुरुस्त करणे गरजेचे आहे. सध्याचे वातावरण पाहता, वीजेचा वापर वाढला आहे. त्यामुळे घरातील पंखे व एसीचा वापरही वाढला आहे. परंतु त्यांच्या सर्व्हीसीगकडे दुर्लक्ष केल्यास अशा घटना घडण्याची शक्यता अधिक असल्याचे सांगण्यात येत आहे.

## घणसोली विभागात प्लास्टिक प्रतिबंधात्मक मोहीमेत
## १५ हजार दंड वसूली व ३० किलो प्लास्टिक पिशव्या जप्त



**नवी मुंबई :** प्रतिबंधात्मक प्लास्टिकचा वापर रोखण्यासाठी नागरिकांमध्ये जागरुकता निर्माण करण्याप्रमाणेच एकल वापर प्लास्टिक प्रतिबंधात्मक मोहीमा प्रभावीपणे राबविण्यात येत असून प्रतिबंधीत प्लास्टिक जप्त करण्यासोबतच दंडात्मक वसूलीही करण्यात येत आहे.

याकरिता स्थापित भरारी पथकांमार्फत तपासणी कार्यवाही करण्यात येत असते. आज परिमंडळ २ च्या भरारी पथकाने उपआयुक्त डॉ. कैलास गायकवाड यांच्या नियंत्रणाखाली विभाग अधिकारी तथा सहा. आयुक्त श्री. संजय तायडे यांच्या माध्यमातून घणसोली विभागातील दुकानांमध्ये अचानक जाउन प्लास्टिक पिशव्या व एकल वापर प्लास्टिकची तपासणी केली. यामध्ये रॉयल फरसाण घणसोली, दिनेश फरसाण घणसोली व शिवशक्ती मार्ट घणसोली या तीन दुकानांमध्ये प्लास्टिक पिशव्या आढळून आल्याने त्यांच्या कडून प्रत्येकी ५ हजार या प्रमाणे एकूण १५ हजार दंडात्मक रक्कम वसूल करण्यात आली. त्यासोबतच ३० किलो प्लास्टिक पिशव्यांचा साठा जप्त करण्यात आला. प्लास्टिकमुळे मानवी जीवनाला व पर्यावरणाला मोठ्या प्रमाणावर हानी पोहचत असून नागरिकांनी आपल्या दैनंदिन वापरातून एकल वापर प्लास्टिकला हद्दपार करावे. त्याकरिता कापडी पिशव्यांचा पर्याय स्विकारावा असे आवाहन करित व्यावसायिकांनीही प्लास्टिक पिशव्या व एकल वापर प्लास्टिक दुकाने / कार्यालये याठिकाणी ठेवू नये असे सूचित करण्यात येत आहे.



दिशादर्शक, मार्गदर्शक!
दिवा न्यूज
www.diwanews.com
सोमवार, दि. २० जानेवारी २०२५


# जे.जे. रुग्णालयात हृदय, किडनी व यकृत प्रत्यारोपण शस्त्रक्रिया व्हाव्यात



## – वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ

**मुंबई :–** सर ज.जी रुग्णालयाचे राज्यात मोठे नाव आहे. या रुग्णालयात हृदय, किडनी व यकृत (लिव्हर) प्रत्यारोपण शस्त्रक्रिया व्हाव्यात, यासाठी आवश्यक साधने व उपकरणे उपलब्ध करुन दिली जातील. तसेच सर ज. जी. समूह रुग्णालयातील सर्वच वॉर्डचे नूतनीकरण करण्यासाठीही आवश्यक निधी उपलब्ध करून दिला जाईल, असे वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ यांनी सांगितले.

या कार्यक्रमास आमदार मनीषा कायंदे, प्रधान सचिव दिनेश वाघमारे, वैद्यकीय शिक्षण व संशोधनचे आयुक्त राजीव नीवतकर, अधिष्ठाता डॉ. पल्लवी सापळे, वैद्यकीय शिक्षण व संशोधनचे संचालक डॉ. अजय चंदनवाले उपस्थित होते.

ग्रँट शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व सर ज. जी. समूह रुग्णालयात वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ यांच्या हस्ते ११ कोटी ७४ लाख किमतींच्या कामांचे उद्घाटन आणि २०५ कोटी २४ लाख रुपये किमतीच्या कामांचे ई – भूमिपूजन करण्यात आले. यामध्ये ग्रँट शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व सर ज. जी. समूह रुग्णालयात ईएनटी विभाग, औषधवैद्यकशास्त्र, अस्थिव्यंगोपचार कक्ष, फिजियोलॉजी लेक्चर हॉलचे उद्घाटन आणि महाविद्यालयात नव्याने बांधण्यात येणाऱ्या व नूतनीकरण करण्यात येणाऱ्या इमारतीच्या कामांचा समावेश आहे.

वैद्यकीय शिक्षण मंत्री श्री. मुश्रीफ म्हणाले, राज्यातील वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये आवश्यक यंत्रसामग्री व सुविधा उपलब्ध करून दिल्या जातील. रुग्णालयात येणाऱ्या सामान्य माणसाला उत्तम प्रकारचे उपचार मिळावेत. यासाठी वैद्यकीय महाविद्यालये व रुग्णालयातील डॉक्टर्स, परिचारिका यासह सर्वच घटकांनी शासनाच्या आरोग्य योजनांचे दूत म्हणून आपली सेवा बजावावी, असे आवाहनही त्यांनी केले.

मुश्रीफ म्हणाले, शासकीय रुग्णालयात उपचार घेण्यासाठी येणाऱ्या रुग्णाला रुग्णालयात आपुलकीची वागणूक व सेवा मिळावी. राज्यात सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल करण्याबाबत शासनाचे प्रयत्न सुरू आहेत. सर्व जिल्ह्यात अशी रुग्णालये उभारण्यात येणार असून या सुविधांमुळे जटिल आजारांवर अधिक प्रभावी उपचार होऊ शकतील. नागपूर येथील ९ शासकीय महाविद्यालयांमध्ये पीपीपी तत्त्वावर एमआरआय, सिटीस्कॅन सेवा सुरू करण्यात येणार आहेत. वैद्यकीय महाविद्यालयात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांनाही सुविधा उपलब्ध करून दिल्या जातील. याठिकाणी सुरू असलेल्या सुपर स्पेशलिटी हॉस्पिटलचे काम लवकरात लवकर पूर्ण करण्याच्या सूचनाही मंत्री श्री. मुश्रीफ यांनी अधिकाऱ्यांना दिल्या.

अवयवदान चळवळीमध्ये जनजागृती करणे महत्त्वाचे असून मेंदू मृत ( ) झालेल्या रुग्णाच्या नातेवाईकांना अवयवदानाचे महत्त्व पटवून द्यावे, असेही श्री. मुश्रीफ म्हणाले.

आमदार मनीषा कायंदे, प्रधान सचिव दिनेश वाघमारे, आयुक्त राजीव निवतकर, संचालक डॉ. अजय चंदनवाले यांनी मनोगत व्यक्त केले. अधिष्ठाता डॉ. पल्लवी सापळे यांनी प्रास्ताविक केले. वैद्यकीय अधीक्षक डॉ. संजय सुरासे यांनी आभार मानले.

या कार्यक्रमात अवयवदान कार्यक्रम यशस्वीरित्या आयोजित केल्याबद्दल डॉ. व्हर्नन वेल्हो, एका आठवड्यात दोन मूत्र प्रत्यारोपण यशस्वीपणे केल्याबद्धल यूरोलॉजी विभागाचे प्रमुख डॉ. अमोल कांबळे, नेफ्रोलॉजी विभागाच्या प्रमुख डॉ. गीता सेठ, सीव्हीटीएस विभाग प्रमुख डॉ. आशिष भिवापूरकर यांच्यासह डॉ. गजानन चव्हाण, डॉ.संजय सुरासे, डॉ.अरुण राठोड , डॉ. पूनम जैस्वाल, डॉ. चित्रा सेल्वराज, सुनील पाटील, राजेंद्र पुजारी, श्रीमती योजना बेलदार श्री.नितीन नवले, सखाराम धुरी, सुरेंद्र शिंदे यांचा यावेळी वैद्यकीय शिक्षण मंत्री मुश्रीफ यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

# नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला दि.बा.पाटील यांचेच नाव–वनमंत्री गणेश नाईक



**नवी मुंबई :** ‘‘नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला दि. बा. पाटील यांचेच नाव दिले जाईल.‘‘असे एकदा पुन्हा वनमंत्री गणेश नाईक यांनी स्पष्ट केले.वाशी येथे नवी मुंबई पुनर्वसन सामाजिक संस्थेच्या वतीने दि.बा. पाटील यांच्या ९९ व्या जयंतीनिमित्त वाशीच्या छत्रपती शिवाजी महाराज चौकात आयोजित एका कार्यक्रमात ते बोलत होते.यावेळी माजी आमदार संदीप नाईक, माजी महापौर सुधाकर सोनवणे, माजी विरोधी पक्षनेते दशरथ भगत व इतर मान्यवर उपस्थित होते.

वनमंत्री गणेश नाईक म्हणाले, नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाचे नामकरण दि.बा.पाटील असेच होईल, असा माझा विश्वास आहे. कारण सर्वांनी नामकरण आंदोलनाला गांभीर्याने घेतले आहे, त्यामुळे लवकरच राज्य आणि केंद्र सरकारच्या स्तरावर सरकारी औपचारिकता पूर्ण करून जनभावनेचा आदर करत येत्या काही महिन्यांत या संदर्भात निर्णय घेतला जाईल.

या प्रसंगी दशरथ भगत म्हणाले की, दि.बा.पाटील यांनी संघर्ष करून पीडितांना न्याय मिळवून दिला. पीडितांसाठी न्याय मिळवण्यासाठी त्यांच्या कार्यातून प्रेरित होऊन आणि त्यांच्या प्रति कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाचे नाव दि.बा.पाटील आंतराष्ट्रीय विमानतळ असे करावे अशी विनंती केली. या प्रसंगी दि.बा.पाटील यांच्या संघर्षमय आणि प्रेरणादायी जीवनावर आधारित छायाचित्र प्रदर्शन, रक्तदान शिबिर, वृक्षारोपण, ज्येष्ठ नागरिक, कचरावेचक महिला, कर्तव्यदक्ष महिला, रिक्षाचालक आणि इतर उल्लेखनीय सामाजिक योगदानकर्त्यांचा सत्कार केला गेला. तसेच अनेक सामाजिक कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते.



दिशादर्शक, मार्गदर्शक!
दिवा न्यूज
सोमवार, दि. २० जानेवारी २०२५
पान : ७
www.diwanews.com

# 'संकल्प कार्यसंस्कृतीचा.. ध्यास राज्याच्या विकासाचा'

SHWAAS
Our Passion Your Care
ACE NX HOSPITAL & RESEARCH CENTRE
Superspeciality Hospital

२५,000 ते २,00,000 पर्यंत विमा योजना



मुख्यमंत्री सहायता निधी
CM Relief Fund

फुफ्फुस प्रत्यारोपण
हाताचे प्रत्यारोपण
हिप रिप्लेसमेंट
गुडघ्यांचे प्रत्यारोपण
अपघात शस्त्रक्रिया
विद्युत अपघात रुग्न
कर्करोग (केमोथेरपी/रेडिएशन)
नवजात शिशुंचे आजार
लहान बालकांचे शस्त्रक्रिया
बर्न रुग्न
अपघात
मेंदूचे आजार
हृदयरोग
कर्करोग शस्त्रक्रिया
डायलिसिस

Address
Mahavir height, Golul Nagari, opp. Mumbai University, Wayle Nagar, Khadakpada, Kalyan, Maharashtra- 421301

Emergency
7777008464
9076229076

## महाराष्ट्र राज्य राजपत्रित अधिकारी महासंघाची बैठक जिल्हाधिकारी कार्यालय येथे संपन्न

**ठाणे :** ७ फेब्रुवारी १९८६ रोजी स्थापन झालेल्या महाराष्ट्र राज्य राजपत्रित अधिकारी महासंघाच्या ३९ व्या वर्धापन दिनानिमित्ताने पूर्वनियोजन व इतर विषयांबाबत आज जिल्हाधिकारी कार्यालयातील समिती सभागृहात बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.

या बैठकीकरिता महासंघाचे संस्थापक व मुख्य सल्लागारग. दि. कुलथे यांची विशेष उपस्थिती लाभली तर त्यांच्यासमवेत महाराष्ट्र राज्य राजपत्रित अधिकारी महासंघाचे अध्यक्ष विनोद देसाई, सरचिटणीस समीर भाटकर, महाराष्ट्र राज्य राजपत्रित अधिकारी महासंघाच्या ठाणे जिल्हा समन्वय समितीचे नवनियुक्त अध्यक्ष तथा निवासी उपजिल्हाधिकारी डॉ. संदीप माने, कोकण विभागाचे सहसचिव डॉ.अविनाश भागवत, सरचिटणीस तथा जिल्हा माहिती अधिकारी मनोज शिवाजी सानप, राज्य कार्यकारिणीचे रमेश जंजाळ, सुदाम टाव्हरे, दिगंबर सिरामे, बापूसाहेब सोनवणे, सिदप्पा बोरकडे, मोहन पवार, डॉ.नितीन मुळीक, डॉ.तरुलता धनके व विविध शासकीय विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

या बैठकीत महासंघाच्या कल्याण केंद्र इमारत बांधकाम निधी संकलनाची प्रगती, महासंघाचे कार्यसंस्कृती अभियान, पगारात भागवा अभियानाची अधिक प्रभावीपणे अंमलबजावणी, जिल्हा समन्वय समितीचे पुनर्गठन आदी विषयांवर चर्चा झाली.

यावेळी महाराष्ट्र राज्य राजपत्रित अधिकारी महासंघाचे संस्थापक व मुख्य सल्लागार ग.दि. कुलथे यांचे प्रमुख मार्गदर्शन झाले. तर महाराष्ट्र राज्य राजपत्रित अधिकारी महासंघाचे अध्यक्ष विनोद देसाई, सरचिटणीस समीर भाटकर यांनी महासंघाच्या पुढील वाटचालीविषयी आपले मनोगत व्यक्त केले. तर ठाणे जिल्हा समन्वय समितीचे नवनियुक्त अध्यक्ष तथा निवासी उपजिल्हाधिकारी डॉ.संदीप माने यांनी आगामी काळात जिल्ह्यातील सर्व राजपत्रित अधिकाऱ्यांच्या एकत्रित समन्वयातून ठाणे जिल्हा समन्वय समिती उल्लेखनीय कामगिरी करेल, असा विश्वास व्यक्त केला.

याप्रसंगी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते 'पगारात भागवा' अभियानाच्या घडीपत्रिकेचे प्रकाशनही करण्यात आले. 'संकल्प कार्यसंस्कृतीचा.. ध्यास राज्याच्या विकासाचा' हे या अभियानाचे ब्रीदवाक्य आहे. यानुसार संपूर्ण राज्यभर हे अभियान राबविण्यात येणार असल्याचे महासंघाचे संस्थापक व मुख्य सल्लागार ग.दि. कुलथे यांनी सांगितले.

## कळवा, मुंब्रा, दिवा क्षेत्रातील दिव्यांगासाठी मोजमाप मूल्यांकन शिवीर

ठाणे : ठाणे महानगरपालिका, समाज कल्याण विभाग, जिल्हा परिषद, ठाणे व भारतीय कृत्रिम अंग निर्माण निगम (एलिम्को) यांच्या संयुक्त विद्यमाने ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील कळवा, मुंब्रा व दिवा प्रभाग क्षेत्रातील दिव्यांग प्रमाणपत्रधारक व ६० वर्षावरील ज्येष्ठ नागरिक यांच्यासाठी कृत्रिम अवयवाकरीता मोजमाप मूल्यांकन करण्यात येणार आहे. हे मोजमाप मूल्यांकन शिबीर दि. २१ आणि २२ जानेवारी रोजी मुंब्रा येथील मौलाना अबुल कलाम आझाद, क्रीडा संकुल येथे आयोजित करण्यात आले आहे. या शिबिरात कोणतेही साहित्य वाटप होणार नसून केवळ लाभार्थ्यांची नोंदणी आणि मोजमाप मूल्यांकन होईल, असे समाजविकास विभागाने स्पष्ट केले आहे.

एडीआयपी योजनेत दिव्यांगजनांना तसेच आरव्हीवाय योजनेत ज्येष्ठ नागरीकांना विविध साहित्याचे वाटप केले जाते. दिव्यांगजनांना तीन चाकी सायकल, व्हिल चेअर, बॅटरीवर चालणारी मोटोराइज्ड तीन चाकी सायकल, कुबड्या, वॉकिंग स्टिक, सीपी चेअर, बोटोई श्रवणयंत्र, ब्रेल केन, ब्रेल स्लेट, ब्रेस कीट, सुगम्य केन, स्मार्ट फोन, कृत्रिम अवयव, कॅलिपर या साहित्याचे वाटप केले जाते.

तर, ज्येष्ठ नागरिकांना व्हिल चेअर, कमोडसह व्हिल चेअर, कमोड खुर्ची, कुबड्या, चालण्यासाठी काठी, ट्रायपॉड, टेट्रापॉड, चष्मा, श्रवण यंत्र, ग्रीवा कॉलर, गुडघा ब्रेस, डेन्चर, एलएस वेल्ट इत्यादी साहित्याचे वाटप केले जाते. या साहित्य वाटपापूर्वी त्यांचे मोजमाप मूल्यांकन करण्याची आवश्यकता असते. त्यासाठी या शिबिराचे आयोजन करण्यात आल्याची माहिती समाज विकास अधिकारी दशरथ वाघमारे यांनी दिली आहे.




# प्रॉपर्टी कार्ड योजना संजीवनी देणारी ठरणार

## कॉंग्रेसने या योजनेपासून लोकांना वंचित ठेवले-उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे

**ठाणे :** गावापासून विकासाची जी घोडदोड सुरू झाली पाहिजे, गाव समृद्ध झालं तर देश समृद्ध होतो आणि देशाचा विकास करायचा असेल तर गावापासून त्याची सुरुवात झाली पाहिजे आणि ती सुरुवात खऱ्या अर्थाने आजच्या कार्यक्रमापासून झाली आहे. त्यामुळे स्वामित्व योजनेअंतर्गत प्रॉपर्टी कार्ड योजना अनेक लोकांसाठी संजीवनी ठरणार असल्याचे प्रतिपादन राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी स्वामित्व योजनेअंतर्गत प्रॉपर्टी कार्डचे वितरण केल्यानंतर प्रसारमाध्यमांशी संवाद साधता केले. तसेच पुढे बोलताना, शिंदे यांनी ५० ते ६० वर्षे देशात सरकार असणाऱ्या कॉंग्रेसने मात्र लोकांना वंचित ठेवल्याचा आरोप यावेळी शिंदे यांनी केला.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते दूरदृष्यप्रणालीद्वारे तर उपमुख्यमंत्री शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत ठाणे जिल्हाधिकारी कार्यालयातील जिल्हा नियोजन समिती सभागृहात कार्ड वितरण कार्यक्रम संपन्न झाला. याप्रसंगी

ठाण्याचे खासदार नरेश म्हस्के, आमदार संजय केळकर, आमदार निरंजन डावखरे, जिल्हाधिकारी अशोक शिनगारे, मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे, अप्पर जिल्हाधिकारी मनिषा जायभाये-धुळे, निवासी उपजिल्हाधिकारी डॉ.संदीप माने, जिल्हा अधीक्षक भूमी अभिलेख बाबासाहेब रेडेकर, जिल्हा नियोजन अधिकारी वैभव कुलकर्णी, उपजिल्हाधिकारी हरिश्चंद्र पाटील, विकास गजरे, मल्लिकार्जुन माने, उप मुख्य कार्यकारी अधिकारी प्रमोद काळे आणि स्वामित्व योजनेचे लाभार्थी उपस्थित आहेत. त्या कार्यक्रमानंतर उपमुख्यमंत्री शिंदे यांनी प्रसारमाध्यमांशी संवाद साधला.

यावेळी बोलताना शिंदे यांनी आजचा दिवस हा महाराष्ट्र पुरत नाही तर देशवासीयांसाठी ऐतिहासिक दिवस आहे. ऑनलाइन पद्धतीने देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते ५० हजार गावांमधील ६२ लाख ग्रामस्थांना या प्रॉपर्टी कार्डचे वितरण झाल्याचे सांगितले. यामध्ये आपल्या जागेची आणि घराची हद्द स्पष्ट झाली असून त्यामुळे होणारे वाद विवाद ही संपुष्टात येतील. त्याचबरोबर प्रॉपर्टी कार्ड मिळाल्यामुळे खऱ्या अर्थाने मालकी हक्क जो आहे, तो प्रत्येकाला मिळेल असेही शिंदे यांनी यावेळी स्पष्ट केले. या प्रॉपर्टी कार्ड मुळे अनेक लोकांनी लोन घेऊन आपले व्यवसाय सुरू केले आणि त्यातून खूप मोठ्या प्रमाणात प्रगती केल्याचेही त्यांनी सांगितले. त्यामुळे ही योजना एक ऐतिहासिक योजना आहे. ही योजना यापूर्वीच सुरू करायला पाहिजे होते, मात्र ५० ते ६० वर्षे जे कॉंग्रेस सरकार होतं त्यांनी या देशातील लोकांना या योजनेपासून वंचित ठेवल्याचा आरोप केला. २०१४ नंतर पंतप्रधान मोदी हे आल्यानंतर त्यांनी अनेक योजना सुरू केल्या आणि २०२२ मध्ये या योजनेला सुरुवात केल्याचेही शिंदे यांनी सांगितले. आज त्याला खऱ्या अर्थाने ती मुहूर्त स्वरूप प्राप्त झाल्याचे हे त्यांनी बोलताना सांगितले.

# दरवर्षी एसटी महामंडळ स्वमालकीच्या ५ हजार लालपरी बसेस खरेदी करणार - परिवहन मंत्री प्रताप सरनाईक



## एसटी महामंडळ नवीन बस खरेदीसाठी पंचवार्षिक योजना आणणार

**मुंबई :** एस. टी महामंडळ दरवर्षी स्वमालकीच्या ५ हजार साध्या लालपरी बसेस खरेदी करणार आहे. यासाठी महामंडळ अंतर्गत पंचवार्षिक नियोजन करण्यात येणार आहे, असा निर्णय आज परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी घेतला. तसेच महामंडळात यापुढे कुठल्याही पद्धतीने भाडेतत्त्वावर बसेस न घेण्याचा महत्त्वपूर्ण निर्णयही त्यांनी घेतला.

परिवहन आयुक्त कार्यालयात एसटी महामंडळ कामकाज आढावा बैठक परिवहन मंत्री श्री. सरनाईक यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली. बैठकीस एस टी महामंडळाचे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ.माधव कुसेकर यांच्या सह सर्व खात्याचे प्रमुख उपस्थित होते.

परिवहन मंत्री प्रताप सरनाईक म्हणाले, नवीन बस खरेदीचा करताना पुढील पाच वर्षात स्क्रॅपिंग (प्रवासी सेवेतून बाद होणाऱ्या) होणाऱ्या बसेसचा विचार करण्यात यावा. याबाबत सर्वांगीण अभ्यास करून पंचवार्षिक योजना आणावी. एस. टी. महामंडळात इलेक्ट्रिक बसेस घेण्यात येत आहे. यासाठी प्रत्येक आगारामध्ये चार्जिंग स्टेशन प्राधान्याने उभारण्यात यावे. महामंडळाने उत्पन्न वाढीसाठी पूरक योजना आणाव्यात. कर्मचाऱ्यांचे वेतन प्रत्येक महिन्याच्या ७ तारखेपर्यंत देण्याची काळजी घेण्यात यावी. पगाराला कुठल्याही परिस्थितीत उशीर होता कामा नये.

शासनाकडून महामंडळाला मिळणारा निधी आगाऊ स्वरूपात मिळण्यासाठी प्रस्ताव तयार करण्याच्या सूचनाही परिवहन मंत्री सरनाईक यांनी यावेळी दिल्या.

परिवहन मंत्री म्हणाले, एसटी महामंडळाने नवीन जाहिरात धोरण आणावे. नवीन येणाऱ्या बसेसवर दोन्ही बाजूला आणि मागील बाजूस अशा तीनही बाजूला डिजिटल जाहिरातीची व्यवस्था असावी. जाहिरात धोरणासाठी अन्य बाबी तपासून यामधून मिळणारे उत्पन्न १०० कोटीपर्यंत आणण्याचे उद्दिष्टी ठेवण्यात यावे. महामंडळाच्या बसेसला राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या रस्त्यांवर टोल माफी मिळण्यासाठी केंद्र शासनाकडे पाठपुरावा करण्यात यावा. तसेच डिझेलवरील व्हॅटमध्ये सवलत देण्यासाठी राज्य शासनाकडे प्रस्ताव पाठविण्यात यावा.

एस टी महामंडळाच्या प्रत्येक डेपोमध्ये डिझेल पंप आहे. या पंपाचा व्यतिरिक्त व्यावसायिक दृष्टिकोनातून उपयोगी ठरतील असे डिझेल पंप सुरु करून उत्पन्न वाढीसाठी पर्याय निर्माण करण्यात यावा. याबाबत इंधन कंपन्यांची करार करावा, अशा सूचनाही परिवहन मंत्री श्री. सरनाईक यांनी दिल्या.